
डेविड आणि दैत्य



माइक मैक्लिनटॉक

चित्र: फ़्रिट्ज़ सिबेल


मराठी: अश्विनी बर्वे

डेविड आणि दैत्य

माइक मैक्लिनटॉक

चित्र: फ़्रिट्ज़ सिबेल

मराठी: अश्विनी बर्वे



डेविड, डेविड,

आपल्या मेंढ्यावर नजर ठेव. त्यांची काळजी घे आणि झोपू नकोस. शेताच्या बाजूला असलेल्या डोंगरावर मेंढ्यांची काळजी घे, त्यांना नुकसान होणार नाही असे बघ.






डेविड, तिथे जंगलात मागे बघ,

तिथे तुला वाघ दिसू शकतो.

तिथे तुला अस्वल दिसेल.

तू लक्ष ठेव.



डेविड, जर एखादे जनावर तुला किंवा मेंढीला खायला आले

तर तुला माहीत आहे तुला काय करायचं आहे ते? तू नेहमी स्वतः जवळ एक दगड ठेव. तुझ्याकडे गोफण आहे ना? गोफण च्या मदतीने

तू कशावर पण वार करू शकतो.



डेविड, तुझे गोफण उचल आणि बघ तू कोणत्या गोष्टीवर वार करू शकतो. ती कोणती गोष्ट असेल? झाडावर बसलेला तो कुरूप पक्षी दिसतो आहे का? तुला माहीत आहे,

त्याला मेंढीचे छोटे पिल्लू दिसते आहे.

तू त्याला मार डेविड:

तू त्याला पळवून लाव.





डेविड, डेविड, तुझी गोफण उचल. त्यात एक दगड लाव, त्याला जोरात फिरव. दगड भिरकावून दे. तू त्याला मारलं, डेविड!

किती अचूक निशाणा होता! तू त्याला जोरात मारले. आता त्याला खाली पडतांना बघ.








डेविड, डेविड, चारी बाजूला बघ. जमिनीवरचा साप बघ: तो मेंढीला मारू शकतो, हे तुला माहीत आहे. आपले गोफण फिरव त्याला पळवून लाव.

कारण तू कोणाला मारू शकतो, जमिनीवरचा साप, हवेत उडणारा पक्षी.

डेविड, आता तुला माहीत आहे काय करायचं आहे?

जर कोणी जनावर मेंढीला खायला आला तर.



डेविड, तू त्या छोट्या मेंढीला पडताना बघितले.

तिचा रडताना आवाज ऐकला.

तिची हाक ऐकली का?

तिला उचल, आणि तिला पक्कं धरून ठेव.

मग ती छोटी मेंढी बरी होईल.



छोट्या मेंढीच्या जवळ बस.

आपले वाद्य उचल.

तिला झोपवण्यासाठी गाणं म्हण.

तुझा आवाज मधुर आहे..

तुझे गाणं ऐकून मेंढ्या तुझ्याजवळ येतात. ते ऐकण्यासाठी पक्षी थांबतात. कारण तू खूप आधीच हार्प वाजवायला शिकला होता.

मधुर आणि हळू आवाजात गा, म्हणजे पक्षी आणि प्राणी आणि मनुष्याला सुद्धा समजेल की तू किती छान गातोस ते. तू जवळजवळ सगळी गाणी गाऊ शकतोस.







तुझे वडील शेतातून येतात. ते म्हणाले, "डेविड, मेंढ्यांची काळजी घेतो आहे. माझ्या बाळा तू आपले काम खूप चांगले करत आहे. पण मी काय सांगते ते ऐक. आता तुला राजाकडे जायला पाहिजे. डेविड, राजाला तुझे गाणं ऐकण्याची इच्छा आहे, राजाला माहीत आहे की लोकांना तुझे गाणे खूप आवडते. आणि राजा उदास आहे.

राजा शाऊल खूप उदास आहे.

तर जा आणि गा.

तू राजा शाऊलसाठी गा."





डेविड, आपला राजा शाऊल महान राजा आहे.

राजा, आजकाल फक्त भिंतीकडे बघत बसतो. तो हस्त नाही, चालत नाही. तो खात नाही, झोपत नाही, तो बोलत नाही.

डेविड, तुझे हार्प वाजव आणि गा.

राजा शाऊलसाठी तू मधुर आणि हळूवार स्वरात गा.

अंधाऱ्या रात्री आकाशात ताऱ्यांचे गाणं गा. जेव्हा सूर्य उगवत आहे तेव्हा प्रकाशाचे गीत गा. फुलांची गाणी गा, झाडांमध्ये हवेची गाणी गा. दिवसेंदिवस गा आणि वाजव. तुझ्या गाण्यामुळे राजा शाऊलच्या चिंता दूर होतील.





राजाला चांगलं वाटेल!

त्यांना उभे राहतांना बघ!

मग तो हसेल आणि तुझा हात धरेल. तो म्हणेल, “बघ, आता मी दुःखी नाही.

डेविड, तुझ्या गाण्याने मला खुश केले आहे. तुझ्या गाण्यामुळे माझ्या चिंता दूर झाल्या आहेत. बघ आता तू इतर दिवशी येऊन गाऊ शकतोस.

पण आता शेताच्यावर असलेल्या डोंगरावर जा आणि आपल्या मेंढ्यावर लक्ष ठेव. त्यांना त्रासापासून वाचव.



ते काय आहे जंगलामधून येत आहे ते?

डेविड, डेविड, ते एक अस्वल आहे!

अस्वल, मेंढ्यांना पकडायला जात आहे. मेंढ्यांची पिल्लं जी गाढ झोपली आहेत. डेविड, लवकर कर आणि तुझे गोफण उचल. त्यात एक दगड लाव आणि ती फिरव.





दगड फिरव!

त्याला भिरकाव!

तू अस्वलाच्या डोळ्यात सरळ वार केला. मोठे अस्वल ओरडले आणि तिथून पळून गेले. अस्वलाला आज एकही मेंढी मिळाली नाही.



तुझ्या वडिलांनी मोठ्या अस्वलाला पळतांना बघितले.

"डेविड," ते म्हणाले," खूप छान! खूप छान!

तू मेंढ्यांना इतके चांगले वाचवतो. आता मी जे सांगतो ते ऐक."



"राजा शाऊलशी लढण्यासाठी एक सेना आली आहे.

त्यांच्याजवळ दहा फुट लांब असा विशाल दैत्य आहे!

दैत्याचे नाव गोलीयथ आहे.

त्याला बघून लोक घाबरून कापतात.

राजा शाऊलला वाटते आहे की लोकांनी लढाईत त्यांना मदत करावी.

तुझा भाऊ काल रात्रीच राजाकडे गेला आहे.

हो, तो राजा शाऊलला मदत करायला गेला आहे. आणि ते आम्हाला सगळ्यांना वाचवण्यासाठी लढेल. पण मला शेतावर थांबावे लागेल. आणि शेताचे रक्षण करावे लागेल. आणि तुला मेंढ्यांना सांभाळावे लागेल.





दिवस, पहिल्यासारखे जातील.

तुला आपल्या भावांचा विचार करावा लागेल जे आत्ता युद्धात लढत आहेत. तुझी इच्छा असेल तर तू सुद्धा राजा शाऊलला मदत करू शकतो. तू त्या दहा फुट उंचीच्या दैत्याबद्दल विचार कर.





आणि मग एक दिवस-ते काय आहे?

एक सिंह येत आहे, तो एक मोठा बोका आहे. तो अगदी गुपचूप हळूवार येत आहे.

डेविड, आपली गोफण उचल आणि फिरव!

पण डेविड, सावध रहा!

सिंह खूप मोठा आहे, तो अस्वला इतकाच मोठा आहे.



तू एक दगड वेगाने उडवला,मग दुसरा, तू त्याला मारला. पण सिहाने काय केले.

तो पळाला नाही. त्याने तुला मारण्यासाठी झेप घेतली.





तू दुसऱ्यांदा जोरात वार केला. सिंह वेगात होता.
तो दगडाच्या गोफणेच्या टप्प्यातून बाहेर पडला.
तू सरळ सिंहाच्या डोक्यावर वार केला.!

सिंह खाली पडला. सिंह मेला.



तुझे वडील म्हणाले, “चांगले केले! चांगले केले!

मी तुला सिंहाला मारतांना बघितले, माझ्या बाळा!

डेविड, तू त्याला त्या गोफणीने मारले.

तू नक्कीच एखाद्या शत्रूला मारू शकतो!



“पण ऐक मला जे म्हणायचं आहे ते.

मला वाटते की तू खूप दूर निघून जा. तुझे हार्प आणि गोफण बरोबर घेऊन जा. आणि राजाच्या शिबिराची माहीती काढ. हे पदार्थ तुझ्या भावांसाठी घेऊन जा. प्रवास लांबचा आहे, स्वतःची काळजी घे.”





जेव्हा सकाळ होईल तेव्हा चालायला लाग. तुला काही शेतांतून, एक छोट्या शहरातून जावे लागेल. शेवटी तू राजाच्या शिबिरापर्यंत पोहचशील. तुझे भाऊ तू आणलेले पदार्थ खातील. आणि मग ते तुला काही दुःखद बातम्या सांगतील. ते म्हणतील की युद्ध बरोबर चालू नाही. राजाचे हृदय भीतीने भरलेले आहे. आणि सैन्यातले बाकी सैनिक सुद्धा घाबरलेले आहेत.






डेविड, ज़रा तो आवाज़ ऐक!

जो झाडांना हलवतो! ज्याने

जमिनीला कंप सुटतो.




बघ, तो दहा फुट उंच दैत्य येत आहे.

गोलियथ येत आहे! त्याचा आवाज ऐक.

गोलियथ मोठ्याने म्हणतो. “फक्त एक माणूस पाठवा, आणि त्याच्यात हिंमत असेल तर माझ्याशी लढायला पाठवून द्या. आणि जर त्याने मला मारले, तर तुम्ही युद्ध जिंकले. जर त्याला मी मारले, तर तुम्ही कधीच लढणार नाही.

शाऊलचे सगळे लोक भीतीने कापत होते आणि एकही माणूस लढण्यासाठी पुढे येत नाही. दैत्य हसतो, तुम्ही त्याचा आवाज ऐकू शकतात. “शाऊल कडे एकही शूर माणूस लढण्यासाठी नाही का?”





पण कोणीही सैनिक लढण्यासाठी गेला नाही. आणि तू म्हणतोस की, “आज मी दैत्यशी लढेन.” तुझे भाऊ ओरडत आहेत, “तू जाऊ नकोस, कारण तो तुला एकाच वार मध्ये मारेल.डेविड तू अजून लहान मुलगा आहे, तो दैत्य तुला एका खेळण्यासारखा तोडून टाकेल.”



पण ऐक डेविड, तू फक्त एवढेच म्हण,

“मी आज दैत्याशी लढेल!” मग तुझे भाऊ तुला शाऊल राजाकडे घेऊन जातील. तू त्यांच्याशी बोल. तू त्यांना सगळे सांग. तू राजाला सांग की तुला त्या दैत्याशी लढू इच्छितो.

तू त्याच्याशी कसा लढेल? ते तू राजाला सांग. डेविड, तू त्यांना सगळं सांग, की तू सिंहाच्या जबड्याला, अस्वलाच्या पंजाला घाबरला नाही, आणि तुला तिथे असलेल्या दैत्याची भीती वाटत नाही.



"डेविड, तू शूर आहे!" शाऊलने म्हटले.

"पण दैत्य खूप मोठा आहे आणि तू खूप छोटा आहे.

तो एक दानव आहे, युद्धातील शूरवीर आहे.

आणि तू या आधी कोणाशी लढलेला नाही. पण तरीही मी बघतो आहे तुला कोणाची भीती वाटत नाही. म्हणून माझे कवच घे, माझा भालाही घे. त्याची तुला लढण्यासाठी मदत होईल. अच्छा आता जा - आणि आपल्या पूर्ण ताकदीने जाऊन लढ."


पण डेविडला शाऊलच्या भाल्याची गरज नव्हती. त्याला अशा हत्यारांची गरज नव्हती.

डेविड, तुला माहीत आहे काय करायचं आहे. जेव्हा दैत्य तुला मारायला येईल ते?

डेविड, आता तू एकटा जा. आणि रस्त्यातील एक दगड उचलून आण. दगड गोफणीत बसव. आणि जाताना गा! डेविड ग!

दैत्य तुला येतांना बघेल. तो ओरडला, “अरे, हे काय आहे?

त्यांच्याजवळ कोणी शूरवीर नाही, म्हणून त्यांनी तुला पाठवले. बघ मी एकाच वारात तुझे दोन तुकडे कसे करतो ते!”



मग दैत्याने आपला भाला उचलला. पण, डेविड,

तू त्याला कधीच घाबरू नकोस. तू पळत त्याच्यामागे जा डेविड. तुझ्याजवळ गोफण आहे. तू त्याला झुलव. मग तो उडव. दगड दूर आणि उंच उडव. गोफण फिरव. ते वेगाने फिरव! ज्यातून वेगाने दगड बाहेर पडू लागतील.





तू दैत्याच्या डोक्यावर वार केला! तो जमिनीवर पडला! दैत्य मेला.

डेविड, डेविड, तो भयानक दानव मेला.





राक्षसाची पूर्ण सेना कापत राहिली. ते पळू लागले, ते आता लढणार नाही. मग शाऊलचे लोक वेगाने पळतील आणि ते शत्रूला आपल्या देशाच्या सीमेबाहेर हाकलून देतील.





डेविड, तू युद्ध जिंकले आहेस.
येणाऱ्या दिवसात तू अजून विजय
मिळवशील. आणि तू तुझे मधूर गाणं
गात राहशील आणि एक दिवस





डेविड, तू नक्की राजा होशील.